महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे- ४११००१

Web : www.dhepune.gov.in | E-mail : budget.dhepune@nic.in
फोन नं.: ०२०/२६१२२११९, २६१३०६२७ | फॅक्स नं : ०२०/२६१११५३

क्रमांक: अर्थसं २१-२२/अशा.अनु.महावि/अकृवि/लेखा-२/ 7740 दिनांक : ०२/०७/२०२१

- 2 JUL 2021

**परिपत्रक**

**अत्यंत महत्वाचे/तातडीचे**

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
(उच्च शिक्षण)

**विषय - राज्यातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील तसेच अकृषि विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या वैद्यकीय प्रतीपुर्ती / अर्जित रजा रोखीकरण/ तासिका तत्वावरील अध्यापकांचे मानधन अदायगी बाबत..**

संदर्भ - १. शासन पत्र क्र. अर्थसं २०१६/(६२/१६)मशि-३, दि. ०३/१०/२०१६.
२.संचालनालयाचे पत्र क्र. अर्थसं २०१९-२०/अर्जित/वैद्यकीय/लेखा-२/७३११, दि. २९/०५/१९

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय पत्रांनुसार सर्व विभागीय सहसंचालकांना कळविण्यात येते कि, अशासकीय अनुदानित महाविद्यालये व अकृषि विद्यापीठांतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांचे वैद्यकीय प्रतिपुर्ती व अर्जित रजा रोखीकरण तसेच अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील तासिका तत्वावरील पात्र अध्यापकांचे मानधन नियमितरित्या व वेळेत अदायगी करण्यात यावी.

**सदर अदायगी करताना खालील अटी व नियमांचे पालन करण्यात यावे.**

१. अशासकीय अनुदानित महाविद्यालये व अकृषि विद्यापीठांतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांचे वैद्यकीय प्रतिपुर्ती व अर्जित रजा रोखीकरणाच्या प्रस्तावाची तपासणी / छाननी प्रचलित शासन नियमांनुसार करण्यात यावी.
२. अशासकीय अनुदानित महाविद्यालयांतील तासिका तत्वावरील पात्र अध्यापकांचे मानधन प्रचलित शासन नियमांनुसार करण्यात यावे.
३. संबंधित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांचे वैद्यकीय प्रतिपुर्ती / अर्जित रजा रोखीकरण / तासिका तत्वावरील मानधन दुबार होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.
४. उपरोक्त अदायगी करताना दरमहाचे नियमित वेतनासाठी तरतुद कमी पडणार नाही तसेच विलंब होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.
५. सदर अदायगी केले बाबतचा तपशील दरमहा संचालनालयास सादर करण्यात यावा.
६. उक्त नुसार उचित कार्यवाही करण्याबाबतची सर्व जबाबदारी संबंधित विभागीय सहसंचालक यांची राहील.

**( डॉ. धनराज माने )**
शिक्षण संचालक,(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१

प्रत - माहितीस्तव सविनय सादर.
मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२ .